तात्काळ / कालमर्यादा

जा.क्र. ई-१/पोउनि/बिसंवि/स.सा.बदल्या-१३/२०१३/३६५८
अपर पोलीस महासंचालक व संचालक कार्यालय,
पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य, पुणे - ८
दिनांक :- २९ /०५/२०१३.

**विषय :- सर्वसाधारण बदल्या - २०१३ व बदलीवर कार्यमुक्त करणेबाबत**
पोलीस उपनिरिक्षक बि सं (अभि / वाह )

संदर्भ :- १) या कार्यालयाचे आदेश जा क्र ई-१/पोउनि/बिस/ अभि/ ससा.बदल्या-१३/ /२०१३/३४६५ दि. २२/०५/२०१३ आणि
२) या कार्यालयाचे आदेश जा क्र ई-१/पोउनि/बिस/ वाह/ ससा.बदल्या-१३/ /२०१३/ ३३८७ दि १८/५/२०१३ आणि क्र ३३९० दि. २०/०५/२०१३

**************

उपरोक्त संदर्भाकिंत आदेशाअन्वये पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरिक्षक बि सं (अभियांत्रिकी) आणि (वाहतूक) यांचे सर्वसाधारण बदल्याचे आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत. सदरील आदेश www.mahpolwireless.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत.

२. **सदरील बदलीचे आदेशाधीन व सध्याचे ठिकाणी ३ वर्षे सेवा पूर्ण झालेले अधिकारी यांना बदलीवर न चुकता तात्काळ कार्यमुक्त करावे.**

३ तसेच उपरोक्त बदली आदेशातील ज्या अधिकारी यांचे नांवासमोर त्यांना विशिष्ट तारखेसच बदलीवर कार्यमुक्त करावे असे आदेश दिलेले आहेत त्यांना त्याच दिवशी न चुकता कार्यालयीन वेळेनंतर तात्काळ कार्यमुक्त करावे

४ तथापि, बदली झालेले ठिकाणी पो उपनि बि सं यांना कार्यमुक्त करणेपूर्वी ते ज्या घटकात बदलीवर जाणार आहेत त्या घटकप्रमुखांकडे रिक्त पदांची खात्री करुन त्यांना कार्यमुक्त करावे

५ तसेच त्यांना बदलीवर कार्यमुक्त केलेचा दिनांक संबंधीत घटकप्रमुखांनी या कार्यालयास तात्काळ फॅक्सदवारे कळवावा

६ जे पो उप नि बि सं बदली घटकात विहीत मुदतीत हजर होणार नाहीत अशांविरुध्द मा पो महासंचालक कार्यालयाचे परिपत्रक क्र २/५५/०७ दि ११/०१/१९८४ व दि १०/०२/१९९१ , क्र पोमसं/३/ ५५०७/ ६/९७ दि १३/०२/१९९७ मधील सूचनांप्रमाणे संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब कारवाई सुरु करावी व तसे कळवावे

७ आदेशाप्रमाणे बदली झालेले पो उपनिरिक्षकांना कार्यमुक्त करताना पर्यायी/ बदलीवर येणारे पो उपनिरिक्षकाची वाट पाहू नये. आदेशांप्रमाणे अधिका-यांना बदलीवर न सोडणेचे प्रकरणांचा गांभीर्याने प्रतिकूल विचार केला जाईल

८ बदली करणेत आलेले पोलीस उपनिरिक्षकास विहीत मुदतीत कार्यमुक्त करण्याची व्यक्तीशः जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखाची राहील, याची कृपया त्यांनी नोंद घ्यावी

९ जर एखादे प्रकरणी मा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अथवा न्यायालयाचे बदलीचे अनुषंगाने स्थगितीचे आदेश असतील तर त्या आदेशांप्रमाणे कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल हया कार्यालयास उलटटपाली कळवावा

-2

१० बदली आदेशाची काटेकोरपणे व वेळेत अंमलबजावणी करणेसाठी सर्व घटक प्रमुखांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी. दि बिनतो.

मा अ पो म सं सो
पो बि सं ,म रा पुणे
यांचे मान्यतेने

( ई दा कांबळे )
पोलीस अधीक्षक, बि सं, मुख्यालय
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे करिता.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, मुंबई शहर /ठाणे शहर/पुणे शहर /नवी मुंबई / औरंगाबाद शहर / /नागपूर शहर/ अमरावती शहर

पोलीस अधीक्षक, सातारा/ नंदूरबार/अहमदनगर/सांगली/अकोला/गोंदिया/अमरावती ग्रामीण/ पुणे ग्रामीण/ बीड /लातूर/जळगांव /परभणी/यवतमाळ/ नाशिक ग्रामीण/ उस्मानाबाद/ नांदेड/ सिंधुदुर्ग/ कोल्हापूर / रत्नागिरी / गडचिरोली /धूळे/रत्नागिरी/महामार्ग पोलीस खडकी पुणे/ /सोलापूर ग्रामीण

समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. ०२ पुणे/ गट ७ दौंड /गट ८ मुंबई./गट ११ नवी मुंबई / गट क ०६ धुळे

पोलीस उप आयुक्त बिनतारी संदेश, मुंबई./

पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश, पूर्व विभाग, नागपूर / पश्चिम विभाग, पुणे.

**प्रत** :- सहा.पोलीस आयुक्त बि.सं. ठाणे शहर / पुणे शहर /नवी मुंबई / नागपूर शहर
पोलीस उप अधीक्षक, बि सं, कोल्हापूर परिक्षेत्र / अमरावती परिक्षेत्र / औरंगाबाद परिक्षेत्र / नागपूर परिक्षेत्र / नांदेड परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र / कोकण परिक्षेत्र

पोलीस निरिक्षक, बि सं, औरंगाबाद / सातारा/ नंदूरबार/अहमदनगर/ सांगली/अकोला /गोंदिया/अमरावती ग्रामीण/ पुणे ग्रामीण/ बीड /लातूर/जळगांव /परभणी/यवतमाळ/ सोलापूर ग्रा नाशिक ग्रामीण/ उस्मानाबाद/ नांदेड/ सिंधुदुर्ग/ कोल्हापूर / रत्नागिरी / गडचिरोली / अहेरी गडचिरोली / रा.रा.पो.बल गट क्र. ०२ पुणे/ गट ७ दौंड /गट ८ मुंबई/ गट क्र ६ धुळे